ePaper
महापालिका निवडणुकीपूर्वी भाजपला मोठा धक्का, मोठी बंडखोरी होणार?
वर्ष - 9 । अंक -98 | UDYAM-MH-26-0158827



महाईन्यूज ™

## आतील पानांत

- बांधकाम व्यावसायिकाला दणका!
- तापकीर दांम्पत्य अखेर भाजपात!
- अरवली.. हरवली.. जिरवली!
- भाजपाचा उच्चशिक्षित पॅनेल!

www.mahaenews.com । शुक्रवार, दि. 27 डिसेंबर 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

**पुण्याच्या राजकारणात मोठी उलथापालथ** अजित पवार गटाशी आघाडीला तीव्र विरोध

# पुण्यात तुतारीला मोठा फटका!

## राष्ट्रवादी (शरद पवार गट) सोडून माजी महापौर प्रशांत जगताप काँग्रेसमध्ये दाखल

। पुणे । प्रतिनिधी ।
महाईन्यूज



**पुण्याच्या राजकारणात मोठी उलथापालथ घडवत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या (शरद पवार गट) माजी महापौर प्रशांत जगताप यांनी काँग्रेस पक्षात जाहीर प्रवेश केला आहे. शरद पवार गट आणि अजित पवार गट यांच्यात पुण्यात आघाडी होण्याची शक्यता बळावल्याने जगताप यांनी राष्ट्रवादीला रामराम ठोकला. त्यांच्या या निर्णयामुळे पुण्यात 'तुतारी' चिन्हाला मोठा फटका बसल्याचे मानले जात आहे.**

शुक्रवारी मुंबईतील परळ येथील टिळक भवनमध्ये झालेल्या जाहीर कार्यक्रमात प्रशांत जगताप यांनी आपल्या अनेक सहकाऱ्यांसह काँग्रेसमध्ये प्रवेश केला. काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवार यांच्यासह वरिष्ठ नेत्यांच्या उपस्थितीत हा प्रवेश सोहळा पार पडला.

### 'मी पुरोगामी विचारांचा कार्यकर्ता' – जगताप

काँग्रेसमध्ये प्रवेश करताना प्रशांत जगताप यांनी आपली भूमिका अत्यंत स्पष्ट शब्दांत मांडली. "मी पुरोगामी विचारांचा कार्यकर्ता आहे. छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर तसेच गांधी–नेहरू यांच्या विचारांचा वारसा पुढे नेण्यासाठी काँग्रेसमध्ये प्रवेश केला आहे. माझी लढाई जातीयवाद आणि भ्रष्टाचाराविरोधात आहे. भाजपाला खऱ्या अर्थाने टक्कर देण्याची ताकद फक्त काँग्रेस पक्षात आहे," असे ठाम मत जगताप यांनी व्यक्त केले.

### अजित पवार गटाशी आघाडीला ठाम विरोध

पुण्यात शरद पवार गट आणि अजित पवार गट यांच्यात आगामी महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आघाडी होण्याची जोरदार चर्चा सुरू होती. या संभाव्य आघाडीला प्रशांत जगताप यांनी सुरुवातीपासूनच तीव्र विरोध केला होता. "जातीयवादी आणि संधीसाधू राजकारणाशी तडजोड करणे मला मान्य नाही," अशी भूमिका त्यांनी पक्षांतर्गत बैठकींमध्ये घेतली होती.

आघाडीचा निर्णय जवळपास अंतिम टप्प्यात आल्याचे स्पष्ट होताच, दोन दिवसांपूर्वीच जगताप यांनी राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) चा राजीनामा दिला. त्यानंतर लगेचच त्यांनी काँग्रेसमध्ये प्रवेश करत आपली पुढील राजकीय दिशा स्पष्ट केली.

### पुण्यातील राजकीय समीकरणांवर परिणाम

प्रशांत जगताप यांच्या काँग्रेस प्रवेशामुळे पुण्यातील राजकीय समीकरणांवर मोठा परिणाम होण्याची शक्यता आहे. राष्ट्रवादी (शरद पवार गट) साठी हा मोठा धक्का मानला जात असून, काँग्रेसला शहरी भागात नवे बळ मिळाल्याचे चित्र आहे. विशेषतः आगामी पुणे महापालिका निवडणुकीत याचे पडसाद उमटण्याची दाट शक्यता वर्तवली जात आहे.

### हर्षवर्धन सपकाळांचा भाजपवर जोरदार हल्ला

यावेळी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी भाजपवर जोरदार टीका केली. "काँग्रेसकडे विचारांचा समृद्ध वारसा आहे. दुसरीकडे भाजप हा मनुवादी विचारांचा पक्ष आहे. भाजपाची भूमिका मूठभर लोकांच्या हाती राजसत्ता आणि धर्मसत्ता एकवटण्याची आहे. काँग्रेसने अनेकांना मुख्यमंत्री, मंत्री, आमदार, खासदार केले, पण काही लोक उगवत्या सूर्याला नमस्कार करत पक्ष सोडून गेले," असा टोला सपकाळ यांनी लगावला. ते पुढे म्हणाले, "प्रशांत जगताप यांची जातकुळी वेगळी आहे. ते सत्तेसाठी नव्हे तर वैचारिक लढ्यासाठी काँग्रेसमध्ये आले आहेत. अशा नेत्यांचे काँग्रेसमध्ये स्वागत आहे."

### '२०२९ आपलेच' – विजय वडेट्टीवार

काँग्रेसचे विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवार यांनीही जगताप यांच्या निर्णयाचे कौतुक केले. "प्रशांत जगताप राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) मध्ये काम करत होते. मात्र, त्यांनी जातीयवादी शक्तींशी समझोता करण्यास नकार दिला आणि काँग्रेसमध्ये प्रवेश केला. नेत्यांनी विचारांशी बांधिलकी ठेवली पाहिजे. अनेकांनी त्यांना ऑफर दिल्या, थांबवण्याचे प्रयत्न झाले, पण त्यांनी शाहू–फुले–आंबेडकरांचा विचार सोडला नाही," असे वडेट्टीवार म्हणाले. "जगताप यांच्यासारखे नेते काँग्रेसमध्ये असतील, तर २०२९ हे वर्ष आपलेच आहे," असा आत्मविश्वासही त्यांनी व्यक्त केला.

### महापालिका निवडणुकीसाठी काँग्रेस सज्ज

या कार्यक्रमात नुकत्याच झालेल्या नगरपालिका आणि नगरपंचायत निवडणुकांमध्ये विजयी झालेल्या काँग्रेसच्या ४१ नगराध्यक्षांचा सत्कार करण्यात आला. तसेच आगामी महापालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर 'काँग्रेस लढणार – महाराष्ट्र जिंकणार' या टिझरचे प्रकाशन करण्यात आले. कार्यक्रमाला काँग्रेस कार्य समितीचे सदस्य नसीम खान, गोव्याचे प्रभारी माणिकराव ठाकरे, आमदार हेमंत ओगले, प्रदेश उपाध्यक्ष मोहन जोशी, युवक काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष शिवराज मोरे, वरिष्ठ प्रवक्ते अतुल लोंढे यांच्यासह अनेक प्रमुख नेते उपस्थित होते.

**बांधकाम व्यावसायिक अडचणीत** आदेशाचे पालन न झाल्यास दररोज ३ हजारांचा दंड

# बांधकाम व्यावसायिकाला दणका!

## सोयीसुविधा न दिल्याप्रकरणी दररोज ३ हजारांचा दंड; ताथवडेतील गृहप्रकल्पावर कारवाई

।पुणे।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**गृहप्रकल्पाला झालेला विलंब आणि सदनिकाधारकांना दिलेल्या आश्वासनांप्रमाणे सोयीसुविधा न पुरवल्याप्रकरणी महाराष्ट्र स्थावर संपदा नियामक प्राधिकरणाने (महारेरा) ताथवडे येथील एका गृहप्रकल्पातील बांधकाम व्यावसायिकाला चांगलाच दणका दिला आहे. महारेराने संबंधित विकासकाला एका महिन्यात वाहनतळाची जागा उपलब्ध करून देणे, सर्व मंजूर सोयीसुविधा पूर्ण करणे तसेच सहकारी गृहनिर्माण संस्था स्थापन करण्याचे स्पष्ट आदेश दिले आहेत. हे आदेश पाळण्यात अपयश आल्यास संबंधित बांधकाम व्यावसायिकावर दररोज ३ हजार रुपयांचा दंड आकारण्यात येईल, असा कठोर इशाराही महारेराने दिला आहे.**




महारेराचे सदस्य महेश पाठक यांनी सदनिकाधारकांच्या तक्रारींवर सुनावणी घेतल्यानंतर हा महत्त्वपूर्ण आदेश दिला असून, या निर्णयामुळे ताथवडे परिसरातील संबंधित गृहप्रकल्पातील रहिवाशांना मोठा दिलासा मिळाला आहे.

**सोयीसुविधांची दिलेली आश्वासने कागदावरच**

ताथवडे येथील या गृहनिर्माण प्रकल्पात सदनिका विक्रीच्या वेळी बांधकाम व्यावसायिकाकडून वाहनतळ, व्यायामशाळा, पार्टी एरिया, मुलांसाठी क्रीडांगण, सीसीटीव्ही यंत्रणा तसेच अन्य आवश्यक सोयीसुविधा पुरविण्याचे लेखी व तोंडी आश्वासन देण्यात आले होते. मात्र, प्रत्यक्षात सदनिकाधारकांना या सुविधा वेळेत उपलब्ध करून देण्यात आल्या नाहीत. प्रकल्प पूर्ण होऊन बराच कालावधी उलटूनही रहिवाशांना मूलभूत सुविधांचा अभाव सहन करावा लागत असल्याने अखेर १७ सदनिकाधारकांनी एकत्र येत महारेराकडे दाद मागितली. ॲड. चिन्मय कल्याणकर यांच्यामार्फत ही तक्रार दाखल करण्यात आली होती.

**'करोना काळामुळे विलंब'चा दावा फेटाळला**

सुनावणीदरम्यान संबंधित बांधकाम व्यावसायिकाने 'करोना काळामुळे प्रकल्पातील सोयीसुविधा देण्यास विलंब झाला' असा दावा महारेरासमोर केला. तसेच, शेजारील दुसऱ्या एका प्रकल्पात वाहनतळाची पर्यायी व्यवस्था उपलब्ध करून दिल्याचा युक्तिवादही करण्यात आला.

मात्र, महारेराने हा दावा साफ फेटाळून लावला. "मंजूर आराखड्यानुसार आणि विक्री करारनाम्यात नमूद केल्याप्रमाणे सोयीसुविधा देणे हे विकासकावर बंधनकारक आहे. पर्यायी व्यवस्था किंवा विलंबाचे कारण ग्राह्य धरता येणार नाही," असे स्पष्ट मत महारेराने आपल्या आदेशात नमूद केले.या सर्व बाबी एका महिन्यात पूर्ण करणे बंधनकारक आहे. या कालावधीत आदेशाचे पालन न झाल्यास दररोज ३ हजार रुपयांचा दंड आकारण्यात येईल, असे आदेशात स्पष्टपणे नमूद करण्यात आले आहे.

### एका महिन्याची मुदत; अन्यथा दंड

महारेराने दिलेल्या आदेशानुसार संबंधित विकासकाला सदनिकाधारकांसाठी स्वतंत्र वाहनतळाची जागा उपलब्ध करून देणे, मंजूर आराखड्यानुसार सर्व सोयीसुविधा पूर्ण करणे, तसेच सहकारी गृहनिर्माण संस्था स्थापन करणे. बंधणकारक आहे.

**सदनिकाधारकांना मोठा दिलासा**

या प्रकरणी सदनिकाधारकांची बाजू मांडणारे ॲड. चिन्मय कल्याणकर यांनी महारेराच्या निर्णयाचे स्वागत केले आहे."महारेराने बांधकाम व्यावसायिकाचा विलंबाचा दावा फेटाळून लावत करारनाम्यानुसार सुविधा देणे बंधनकारक असल्याचे ठामपणे स्पष्ट केले. वेळेत सोयीसुविधा न दिल्यामुळे दंडाची तरतूद करण्यात आल्याने सदनिकाधारकांना मोठा दिलासा मिळाला आहे," असे त्यांनी सांगितले. ते पुढे म्हणाले, "वाहनतळासह इतर सोयीसुविधा वेळेत देणे ही केवळ ऐच्छिक बाब नसून विकासकाची कायदेशीर जबाबदारी आहे, हे या आदेशातून पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे. दंडाची तरतूद असल्यामुळे या आदेशाची अंमलबजावणी लवकर होण्याची शक्यता आहे."

**इतर गृहप्रकल्पांसाठी इशारा**

महारेराचा हा निर्णय केवळ ताथवडेतील एका प्रकल्पापुरता मर्यादित नसून, राज्यातील इतर सर्व गृहप्रकल्पांसाठी तो एक महत्त्वाचा इशारा मानला जात आहे. ग्राहकांना दिलेली आश्वासने पाळणे, मंजूर आराखड्यानुसार सुविधा उपलब्ध करून देणे आणि वेळेत प्रकल्प पूर्ण करणे ही विकासकांची जबाबदारी असल्याचे महारेराने पुन्हा अधोरेखित केले आहे. सदनिकाधारकांच्या हक्कांचे संरक्षण करण्यासाठी महारेरा किती कठोर भूमिका घेऊ शकते, याचे हे ताजे उदाहरण असून, भविष्यात अशा प्रकारच्या तक्रारींवर कटेकोर कारवाई होण्याची शक्यता आहे.

# पुण्याच्या राजकारणात मोठा ट्विस्ट!

## दोन्ही राष्ट्रवादींची चर्चा फिस्कटली, शरद पवार गटाचा मोठा निर्णय

। पुणे ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**पुणे महापालिका निवडणुकीच्या तोंडावर गेल्या काही दिवसांपासून शहरात 'पुणे पॅटर्न'ची म्हणजेच शरद पवार आणि अजित पवार गटाच्या स्थानिक युतीची जोरदार चर्चा सुरू होती. मात्र, काल दुपारी झालेल्या एका निर्णायक बैठकीत या चर्चांना पूर्णविराम मिळाला आहे.**



जागावाटप आणि निवडणूक चिन्हावरून मतभेद झाल्यानंतर अजित पवारांसोबतची बैठक फिस्कटली असून, शरद पवारांच्या राष्ट्रवादीने पुन्हा एकदा महाविकास आघाडीच्या (मविआ) साथीनेच लढण्याचा निर्णय घेत थेट काँग्रेस आणि ठाकरेंच्या शिवसेनेशी जुळवून घेतले आहे.

**नेमकं काय घडलं बैठकीत?**

आज दुपारी अजित पवार गट आणि शरद पवार गट यांच्यात जागावाटपासाठी एक महत्त्वाची बैठक पार पडली. सूत्रांच्या माहितीनुसार, या बैठकीत अजित पवारांच्या गटाकडून शरद पवारांच्या पक्षाला अत्यंत जाचक अटी घालण्यात आल्या. अजितदादांच्या गटाने शरद पवार गटाला पुण्यात केवळ ३५ जागा देण्याचा प्रस्ताव ठेवला. एवढचं नाही या ३५ जागांवरही उमेदवारांनी अजित पवारांच्या 'घड्याळ' या चिन्हावरच निवडणूक लढवावी, अशी अट घालण्यात आली. स्वतःच्या पक्षाचे अस्तित्व पणाला लावणारा हा प्रस्ताव शरद पवार गटाला पूर्णपणे अमान्य होता. त्यामुळे ही युती होणे अशक्य असल्याचे स्पष्ट होताच, शरद पवार गटाच्या नेत्यांनी बैठकीतून काढता पाय घेतला.

**दिग्गज नेत्यांची उपस्थिती**

या महत्त्वपूर्ण बैठकीला तिन्ही पक्षांतील प्रमुख स्थानिक नेते उपस्थित आहेत. शरद पवार गटाकडून विशाल तांबे, अंकुश काकडे, मनाली भिलारे, अश्विनी कदम आणि आमदार बापूसाहेब पठारे, तर काँग्रेसकडून अरविंद शिंदे, अभय छाजेड आणि रमेश बागवे आणि ठाकरे गटाकडून (शिवसेना) वसंत मोरे, गजानन थरकुडे आणि संजय मोरे हे बैठकीत हजर आहेत.

पुणे महापालिकेत काका-पुतण्या एकत्र येतील या आशेवर असलेल्या कार्यकर्त्यांना या घडामोडीमुळे मोठा धक्का बसला आहे. मात्र, घड्याळ चिन्हावर लढण्यास नकार देत शरद पवार गटाने आपण आपल्या भूमिकेशी ठाम असल्याचे पुन्हा एकदा दाखवून दिले आहे. आता हॉटेल शांताईमधील या बैठकीतून जागावाटपाचे कोणते नवीन सूत्र ठरते, याकडे लक्ष लागलेले आहे.

### हॉटेल शांताईमध्ये 'मविआ'ची संयुक्त बैठक

अजित पवारांसोबतची बोलणी फिस्कटताच, शरद पवार गटाने वेळ न दवडता थेट महाविकास आघाडीच्या घटक पक्षांशी संपर्क साधला. पुण्यातील हॉटेल शांताई येथे तातडीने काँग्रेस, उद्धव ठाकरेंची शिवसेना आणि शरद पवारांची राष्ट्रवादी यांची संयुक्त बैठक सुरू झाली. या बैठकीमुळे पुण्यात आता मविआ विरुद्ध महायुती असाच सामना रंगणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.

## पिंपरी-चिंचवड महानगर पालिका निवडणूक : राष्ट्रवादीला आणखी एक धक्का!

# तापकीर दांम्पत्य अखेर भाजपात!

### भाजपाच्या पॅनेलचा प्रचार करणार, चारही उमेदवार निवडून आणणार : विनया तापकीर

।पिंपरी चिंचवड। प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी-चिंचवड महानगरपालिका प्रभाग क्रमांक 3 मधील राष्ट्रवादीच्या माजी नगरसेविका विनया तापकीर आणि प्रभावशाली सामाजिक कार्यकर्ते प्रदीप तापकीर यांनी भाजपा आमदार महेश लांडगे यांच्या नेतृत्त्वात भारतीय जनता पार्टीत अधिकृत प्रवेश केला. राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाला हा मोठा धक्का मानला जात आहे.**




विशेष म्हणजे, आमदार महेश लांडगे देतील त्या उमेदवारांचे काम आम्ही करणार आहोत. चऱ्होलीच्या विकासात योगदान आम्ही दिले असून, आगामी काळात आमदार महेश लांडगे यांच्या नेतृत्वात आणखी विकासकामे मार्गी लागतील, असा विश्वास माजी नगरसेविका विनया तापकीर यांनी व्यक्त केला आहे.

पिंपरी-चिंचवड भाजपा मध्यवर्ती जनसंपर्क कार्यालय येथे तापकीर दांम्पत्याचा जाहीर पक्षप्रवेश करण्यात आला. यावेळी विधान परिषदेचे आमदार अमित गोरखे, माजी उपमहापौर प्रभाकर वाघेरे आणि माजी नगरसेवक उल्हास शेट्टी उपस्थित होते.

पिंपरी-चिंचवड महानगरपालिका प्रभाग क्रमांक 3 मोशी गावठाण, गंधर्वनगरी, संत ज्ञानेश्वरनगर भाग, साई मंदिर परिसर, गोखले मळा, अलंकापुरम सोसायटी, वडमुखवाडी, काळजेवाडी, पठारेमळा, ताजणेमळा, चोवीसावाडी चहोली, डुडुळगाव या परिसरात आणि प्रभाग क्रमांक 4 मधील काही भागात आता भाजपाची ताकद मोठ्या प्रमाणात वाढली आहे.

सामाजिक कार्यकर्ते प्रदीप तापकीर म्हणाले की, 2014 पासून आमदार महेश लांडगे यांच्या नेतृत्वामध्ये चऱ्होलीसह समाविष्ट गावांमध्ये चांगला विकास होतो आहे. त्यामुळे विकासाच्या मुद्यावर आम्ही भाजपासोबत जाण्याचा निर्णय घेतला. आम्ही भाजपाचे पॅनेल निवडून आणण्यासाठी सर्वोतोपरी प्रयत्न करणार आहोत.

दरम्यान, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष आणि उपमुख्यमंत्री अजित पवार शहरात दौरा केला. ज्येष्ठ नेते आझम पानसरे यांच्या निवासस्थानी भेट दिली. त्याचवेळी भाजपाच्या पक्ष कार्यालयात माजी नगरसेविका विनया तापकीर आणि प्रदीप तापकीर यांनी भाजपाचे ‘कमळ’ हाती घेतले. यापूर्वीच मुंबईच येथील पक्षप्रवेश कार्यक्रमात आमदार महेश लांडगे यांच्या नेतृत्वात तब्बल 22 माजी नगरसेवक, माजी महापौर, उपमहापौर यांनी भाजपात प्रवेश केला होता.

> “ चऱ्होली आणि परिसरात माजी नगरसेविका विनया तापकीर आणि कुटुंबियांनी सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात योगदान दिले आहे. चऱ्होलीचा सर्वांगीण विकासाचा विचार घेवून त्यांनी भाजपाची विचारधारा स्वीकारली आहे. भाजपा परिवारात त्यांचे स्वागत करतो. त्यांचा पक्षामध्ये कायम आदर होईल. तसेच, सर्वांनी एकजुटीने शहराच्या शाश्वत विकासाच्या वाटचालीमध्ये सक्रीय योगदान देण्याचा आम्ही प्रयत्न करणार आहोत.
>
> –**महेश लांडगे,** आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड.

## भाजपाचा “सस्पेन्स” कायम : पहिली उमेदवारी यादी रविवारी होणार प्रसिद्ध!

### मिशन- PCMC : निवडणूक प्रमुख आमदार शंकर जगताप यांची माहिती

।पिंपरी चिंचवड। प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी चिंचवड महापालिका निवडणुकांसाठी भाजपच्या उमेदवारांची अंतिम यादी प्रदेश कार्यालयाकडे सादर करण्यात आली आहे. पक्षश्रेष्ठींनी विधानसभानिहाय उमेदवारांचा आढावा घेतला असून, उमेदवारांची पहिली यादी रविवारी (दि. २८) प्रसिद्ध करण्यात येईल अशी माहिती पिंपरी चिंचवड निवडणूक प्रचार प्रमुख आमदार शंकर जगताप यांनी शुक्रवारी (दि. २६ ) हि माहिती दिली.**



आमदार शंकर जगताप यावेळी म्हणाले, दोन दिवसात उमेदवार यादी जाहीर करण्यात येणार आहे. पालिका निवडणुकीसाठी भाजपच्या उमेदवारांची अंतिम यादी आम्ही प्रदेश कार्यालयाकडे पाठविली आहे . मुंबईत या संदर्भात बैठक झाली. बैठकीला सर्व कोअर कमिटीचे सदस्य उपस्थित होते. उमेदवारांचा विधानसभा निहाय आढावा या बैठकीमध्ये घेण्यात आलेला आहे. ज्या प्रभागांमध्ये उमेदवारी निश्चित आहे त्या नावांना अंतिम मान्यता दिली असली तरीही अंतिम निर्णय हा पक्षश्रेष्ठींचाच असणार आहे. त्यानुसार प्रदेश आणि कोअर कमिटी याबाबत निर्णय घेईल.

भारतीय जनता पक्ष हा विकासाचे व्हिजन पुढे ठेवून काम करणारा पक्ष आहे. त्यामुळे विरोधक कितीही एकत्र आले तरीही त्याचा आमच्या पक्षावर परिणाम होणार नाही . आमच्या उमेदवारांचा विजय हा निश्चित आहे. भारतीय जनता पक्षामध्ये सर्व निष्ठावंत कार्यकर्त्यांना वेळोवेळी न्याय देण्यात येतो हा इतिहास आहे. कुठल्याही परिस्थितीत निष्ठावंत कार्यकर्त्यावर पक्षाकडून अन्याय होत नाही त्यामुळे आमच्या उमेदवार यादी जाहीर झाल्यानंतरही कोणत्याही प्रभागात नाराजी दिसून येणार नाही. भारतीय जनता पक्ष हा जगातील सर्वात जास्त सदस्य संख्या असलेला पक्ष आहे. त्यामुळे भारतीय जनता पक्षामध्ये येऊन विकासाचे व्हिजन घेऊन कोणी काम करण्यासाठी इच्छुक असेल तर पक्षाकडून त्याचे स्वागतच केले जाते असे देखील आमदार शंकर जगताप यावेळी म्हणाले. कार्यकर्त्यांना माझा नेहमीच पाठिंबा असतो. कार्यकर्त्यांच्या बळावरच कोणतीही लढाई जिंकली जाते. उमेदवारी यादी जाहीर झाल्यानंतरही निष्ठावंतांवर कुठल्याही प्रकारचा अन्याय झाला असे दिसणार नाही. सर्वेक्षणानुसार विजयाची क्षमता असणारे उमेदवार निवडण्यात येणार आहेत ही भाजपची रणनीती आहे. त्यानुसारच पक्षश्रेष्ठींकडून उमेदवार यादी अंतिम करण्यात येत आहे.

**थम्पिंग मेजॉरिटीने भाजप विजयी होईल**

प्रथम राष्ट्र, नंतर पक्ष आणि मग आपण या सूत्रावर भारतीय जनता पक्षाचे काम आधारित आहे. हा विचार घेऊनच या पक्षामधील प्रत्येक कार्यकर्ता काम करत आहे. पक्षाचा आदेश हेच अंतिम ध्येय असते. त्यामुळे नाराजी किंवा विरोध असे कोणीही कार्यकर्ता करत नाही. तिकीट मिळेपर्यंत नाराजी असते. मात्र एकदा पक्षाचा आदेश आला की आपण कामाला लागायचे असते. भाजपमध्ये सध्या इलेक्टिव्ह मेरिट असणाऱ्या उमेदवारांची संख्या जास्त प्रमाणात आहे.

> “ उमेदवार यादी जाहीर झाल्यानंतर भाजपच्या निष्ठावंत कार्यकर्त्यांवर अन्याय होणार नाही याची काळजी पक्षश्रेष्ठी घेणार आहेत. कार्यकर्त्यांच्या बळावरच पक्ष मोठा होत असतो. त्यामुळे निष्ठावंत कार्यकर्त्याला पक्ष न्याय देईलच असा मला विश्वास आहे. उमेदवारांची पहिली यादी रविवारी (दि. २८) प्रसिद्ध करण्यात येईल. पक्षाचा आदेश आल्यानंतर सर्वजण एक दिलाने, एक विचाराने काम करणार असून, पिंपरी चिंचवड महापालिकेत कमळ फुलविल्याशिवाय राहणार नाहीत.
>
> – **शंकर जगताप,** निवडणूक प्रचार प्रमुख, भाजपा.

# अरवली.. हरवली.. जिरवली!




**जमिनीवरील सपाटीपासून १०० मीटर (३२८ फूट) वा अधिक उंची असेल तरच त्या टेकडीस अरवली पर्वताचा भाग मानले जाईल आणि अध्र्या किलोमीटरच्या आत इतक्या किमान उंचीचे किमान दोन वा अधिक उंचवटे असतील तर(च) त्यांस अरवली पर्वतराजीचा घटक समजले जाईल, अशी नवी व्याख्या सर्वोच्च न्यायालयाच्या सौजन्याने मंजूर झाली आणि हा वाद सुरू झाला.**

एखाद्या जैविक घटकाची उपयुक्तता, अस्तित्वाबाबतचा निर्णय हा त्याच्या/तिच्या शारीर उंची वा आकार यावरून घेणे शहाणपणाचे असेल काय? म्हणजे अशोकाचे झाड काही विशिष्ट उंचीचे नाही म्हणून तो 'अशोकच नाही', झुडूप आहे असे म्हणून त्याची कत्तल करावी काय? एखादा अजगर लांबीने कमी असल्यास त्यास अजगर न मानता कृमी मानून त्याचे अस्तित्व संपवावे काय? एखाद्या नदीची लांबी/ रुंदी विशिष्ट नाही म्हणून तीस नाला समजून कोरडे होऊ द्यावे काय? एखाद्या तलावात काही कारणाने पाणी कमी झाल्यास त्यास तलाव न मानता मोकळे मैदान मानून ते सुखाने सुकू द्यावे काय? या आणि अशा काही प्रश्नांची उत्तरे देण्याइतके शहाणपण ज्यांच्या ठायी आहे त्यांस अरवली परिसराचा वाद नक्की काय हे कळेल आणि त्या वादावरील त्यांचे मत स्पष्टपणे तयार होईल.



जमिनीवरील सपाटीपासून १०० मीटर (३२८ फूट) वा अधिक उंची असेल तरच त्या टेकडीस अरवली पर्वताचा भाग मानले जाईल आणि अध्र्या किलोमीटरच्या आत इतक्या किमान उंचीचे किमान दोन वा अधिक उंचवटे असतील तर(च) त्यांस अरवली पर्वतराजीचा घटक समजले जाईल, अशी नवी व्याख्या सर्वोच्च न्यायालयाच्या सौजन्याने मंजूर झाली आणि हा वाद सुरू झाला. याचा अर्थ असा की १०० मीटर उंचीपेक्षा कमी उंचीचा डोंगर/ टेकडी इत्यादी भूभाग हा अरवली पर्वताचा हिस्सा मानला जाणार नाही आणि तो कापण्यास सर्रास परवानगी दिली जाईल. या परिसरात सुखेनैव खाणकामही करता येईल. एखादी टेकडी बिचारी ९९ मीटर उंचीचीच असेल तर आपल्या मायबाप सरकारच्या मते यापुढे ती कापून काढण्याच्या लायकीची असेल. नुकतेच निवृत्त सरन्यायाधीश भूषण गवई यांच्या पीठाने २० नोव्हेंबरास केंद्र सरकारची ही उंची व्याख्या मान्य केली आणि 'अरवली वाचवा' मोहीम हाती घेत या पर्वतरांगेने जोडल्या गेलेल्या चार राज्यांतील सुबुद्ध नागरिक रस्त्यावर उतरले. अरवली पर्वतराजी ही उत्तर भारतीय भूगोलातील एक मुख्य नैसर्गिक निर्मिती. आपल्या शेजारील गुजरातपासून राजस्थान, हरयाणा आणि अखेर दिल्लीपर्यंत ही पर्वतरांग पसरलेली आहे. या पर्वतराजीच्या अलीकडे आणि पलीकडे अशा दोन पर्यावरणीय व्यवस्था तयार झाल्या. राजस्थानातील वालुकामय प्रदेश दिल्लीकडे सरकला नाही कारण या पर्वतराजीने त्यास रोखले. एखादा डोंगर, पर्वत, पर्वतराजी ही त्या त्या प्रदेशातील वातावरणाचे कार्यकारण असते. अरवली पर्वतरांग ही त्यापैकी एक.

तिच्या अस्तित्वालाच नख लावण्याचा प्रयत्न हा आताचा नाही. याहीआधी २०१० साली राजस्थान सरकारने या पर्वतराजीत विकासाच्या नावे घुसखोरी करण्याचा प्रयत्न केला. त्या वेळी न्यायालयाने तो हाणून पाडला. त्यासाठी न्यायालयाने 'फॉरेस्ट सर्व्हे ऑफ इंडिया' या मध्यवर्ती यंत्रणेकडून या पर्वतराजी परिसराचा रीतसर अभ्यास करून घेतला. या यंत्रणेने पर्वतराजीचा भूभाग प्रत्यक्ष पाहून आपला निष्कर्ष सादर केला आणि काही ठिकाणी उंच असलेले या रांगेतील डोंगर अनेक ठिकाणी तीन अंशाच्या कोनातही उतरतात हे दाखवून दिले. सबब ही सर्व पर्वतरांग एकसंध मानली जावी असे या संस्थेच्या तज्ज्ञांचे म्हणणे. न्यायालयाने ते ग्राह्य धरले आणि उंची हा निकष न मानता समग्र पर्वतराजीच्या रक्षणाचा आदेश दिला. सर्वोच्च न्यायालयातही त्यावर शिक्कामोर्तब झाले. तथापि न्या. गवई यांच्या पीठाने आधीच्या अन्य काही निकालांप्रमाणे याबाबत वेगळी भूमिका घेतली आणि केंद्र सरकारची पर्वतरांग ठरवण्याची नवी व्याख्या स्वीकारली. प्रकल्पांची पूर्वलक्ष्यी पर्यावरणीय मंजुरी ग्राह्य ठरवणारा १८ नोव्हेंबर २०२५ रोजीचा निर्णयदेखील न्या. गवई यांचाच, ही बाब या संदर्भात सूचक. अरवली पर्वतराजीबाबतही त्यांनी केंद्राच्या बदलत्या व्याख्येस न्यायालयीन मान्यता दिली आणि देशभरातील पर्यावरणप्रेमींमध्ये एकच संतापाची लाट उसळली. हा संताप अस्थानी नाही.

## प्रासंगिक »

### रोकडे काही...

***राज आणि उद्धव या दोघांबाबत हे घडले. मानवी भावजीवनाचे प्रतिबिंब राजकारणातही पडणे साहजिक. तेव्हा जे झाले ते काही आक्रीत नव्हे.***

भारत आणि पाकिस्तान यांत जेव्हा सिमला करार झाला तेव्हा बशीर बद्र या नामांकित उर्दू कवीने लिहिले : दुश्मनी जम कर करो लेकिन ये गूंजाइश रहे। जब कभी हम दोस्त हो जाएँ तो शर्मिंदा न हों। उद्धव आणि राज ठाकरे यांच्या पुनर्मीलनावर भाष्य करताना बद्र यांनी व्यक्त केलेल्या भावनेतील आशय हातमिळवणीचे वर्णन करण्यास निश्चितच अयोग्य नाही. राज ठाकरे यांनी स्वत:ची 'मनसे' चूल मांडली त्यास पुढील वर्षी- २०२६ च्या मार्च महिन्यात- दोन दशके होतील. त्यांना मूळच्या शिवसेनेपासून वेगळे व्हावे वाटले कारण त्यांचे आणि शिवसेना संस्थापक बाळासाहेब ठाकरे यांनी नेमलेले उत्तराधिकारी उद्धव यांचे पटेनासे झाले. दोघांची शैली भिन्न. कार्यपद्धती वेगळी. त्यामुळे एकत्र नांदणे अशक्य झाल्याने त्यांनी 'महाराष्ट्र नवनिर्माण सेना' स्थापली. त्या वेळी आणि नंतर काही काळ त्यांच्या या नव्या पक्षाचे मुख्य वैर होते ते मूळ शिवसेना या पक्षाशी. हे असे होते.

2025 च्या बिहार विधानसभा निवडणुकीत राष्ट्रीय लोकशाही आघाडीने (NDA) अभूतपूर्व विजय मिळवला. 243 पैकी तब्बल 202 जागा जिंकून एनडीएने अक्षरशः त्सुनामी आणली. या प्रचंड विजयाचे शिल्पकार म्हणून पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री नितीश कुमार यांची नावे आघाडीवर असताना, पडद्यामागे एक असा रणनीतीकार होता.

## अर्जुनाची जिज्ञासा आणि भगवंतांचे अचिंत्य सामर्थ्य

भगवंतांनी आपल्या अचिंत्य, अपरिमित सामर्थ्याचा निर्देश केल्यानंतर अर्जुनाचे मन आदराने, नम्रतेने आणि भक्तिभावाने भरून आले. अहंकाराचा लवलेशही न ठेवता, अत्यंत ऋजु वृत्तीने त्याने भगवंतांची स्तुती केली. सद्गुरू प्रसन्न होण्यासाठी शिष्याने कसे बोलावे, कशी विनंती करावी, याचा जणू वस्तुपाठच भगवान व्यासांनी अर्जुनाच्या माध्यमातून घालून दिला आहे. ज्ञानाची मागणी ही नम्रतेतून, विश्वासातून आणि श्रद्धेतूनच फलदायी ठरते, हेच या प्रसंगातून अधोरेखित होते.

ज्ञानेश्वर माऊली म्हणतात, 'जेथ विभूति प्रतिविभूति। प्रस्तुत अर्जुना सांगिजेती।।' या अध्यायात भगवंतांनी अर्जुनाला आपल्या सामान्य आणि विशेष अशा विभूती सांगितल्या आहेत. नवव्या अध्यायात भगवंतांनी 'मीच सर्व विश्व व्यापून राहिलो आहे,' हे राजविद्येतील गुह्यतम सूत्र अर्जुनाला सांगितले होते. या सर्वव्यापकतेचे स्वरूप कळल्यानंतर अर्जुनाच्या मनात एक स्वाभाविक प्रश्न निर्माण झाला. आत्मरूपाने अंतर्बाह्य व्यापून राहिलेल्या भगवंताचे दर्शन कसे घ्यावे? त्याची उपासना कशी करावी?



त्याला ओळखण्याचा मार्ग कोणता? यासाठी अर्जुन भगवंतांना विनंती करतो— "हे प्रभो, तू ज्या-ज्या रूपात, ज्या-ज्या ठिकाणी विशेषत्वाने प्रकट होतोस, त्या तुझ्या विभूती मला सांग."

विभूती म्हणजे ईश्वरी सामर्थ्य किंवा वैभव, जे एखाद्या व्यक्तीत, प्राण्यात किंवा वस्तूत प्रकर्षाने प्रकट होते. स्वामी मकरंदनाथ म्हणतात,

'पंढरीचे विटेवरी। शंखचक्रधारी हरी।।
दिसे सुंदर ते ध्यान। रूपी गुंते डोळा मन।।'

भगवंतांचे रूप, त्यांचे वैभव, भक्तांच्या मनाला आणि डोळ्यांना गुंतवून ठेवते. भगवंत स्वतः सांगतात,

'आंगीचिया रोमा किती। जयाचिया तयासी न गणवती।
तैसिया माझिया विभूती। असंख्य मज।।'

जसा मनुष्य आपल्या अंगावरील केसांची संख्या मोजू शकत नाही, तशाच माझ्या विभूती असंख्य आहेत, असे भगवंत स्पष्ट करतात. सातव्या अध्यायात विभूतीयोगाची प्रस्तावना केल्यानंतर अर्जुनाने त्याचा सविस्तर विस्तार मागितला. भगवंतांनी सर्वप्रथम सांगितले— "सर्व भूतमात्रांच्या हृदयात असलेला आत्मा मीच आहे." त्यानंतर त्यांनी एकूण पंच्याहत्तर विभूतींचे वर्णन केले. स्वामी माधवनाथ सांगतात की, मानवी विभूती सांगता सांगता भगवंतांनी प्राणीमात्रांतील आणि वस्तुमात्रांतीलही विभूती स्पष्ट केल्या. घोड्यांमधील उच्चैःश्रवा, हत्तींमधील ऐरावत, वृक्षांमधील अश्वत्थ, इंद्रियांमधील मन— हे सर्व मीच आहे. तसेच स्त्रीशक्तींमध्ये कीर्ती, औदार्य, वाणी, स्मृती, मेधा, धृती आणि क्षमा या सातही शक्ती माझ्याच स्वरूपाच्या आहेत.

अखेर भगवंत सांगतात— "मी संपूर्ण जगताला माझ्या योगशक्तीच्या केवळ एका अंशाने धारण करून ठेवले आहे."

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

स्मार्ट PCMC SMART CITY

# महाईन्यूज™

ePaper

epaper.mahaenews.com

। शनिवार।

। दि. 27 डिसेंबर 2025।

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

## ‘मिशन–PCMC’ अंतर्गत प्रचार मोहिमेची औपचारिक सुरुवात

# भाजपकडून प्रभाग क्रमांक 7 मध्ये प्रचाराचा दणदणीत शुभारंभ!

## मिशन–PCMC : ग्रामदैवत भैरवनाथ महाराज मंदिरातून प्रचाराला सुरुवात

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी-चिंचवड महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर प्रभाग क्रमांक ७ (गव्हाणे वस्ती–भोसरी गावठाण) येथे भारतीय जनता पार्टीच्या उमेदवारांच्या प्रचाराचा दणदणीत शुभारंभ झाला. भोसरी गावचे ग्रामदैवत भैरवनाथ महाराज मंदिरात दर्शन व आशिर्वाद घेऊन ‘मिशन–PCMC’ अंतर्गत प्रचार मोहिमेची औपचारिक सुरुवात करण्यात आली.**





देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या ‘बलशाली भारत आणि विकसित महाराष्ट्र’ या संकल्पनेनुसार पिंपरी-चिंचवड शहराचा शाश्वत व सर्वांगीण विकास साधण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला. हिंदुत्ववादी आमदार महेश लांडगे यांच्या नेतृत्वाखाली प्रत्येक प्रभागातून विकासाची पायाभरणी करण्याचा संकल्प करण्यात आला.

या वेळी भारतीय जनता पार्टीचे उमेदवार नितीन लांडगे, संतोष लोंढे, प्रा. सोनाली गव्हाणे आणि राणी पठारे यांच्या प्रचाराचा शुभारंभ करण्यात आला. कार्यक्रमास आमदार महेश लांडगे यांचे बंधू तथा उद्योजक कार्तिक सर लांडगे यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रचारादरम्यान स्थानिक नागरिकांशी संवाद साधत मूलभूत सुविधा, रस्ते, पाणीपुरवठा, स्वच्छता, पायाभूत विकास आणि नागरी सोयी-सुविधांबाबत भाजपची विकासाभिमुख भूमिका मांडण्यात आली. प्रभाग क्रमांक ७ मध्ये शितलबाग, सेंच्युरी एन्का कॉलनी, सुविधा पार्क, आपटे कॉलनी, सॅन्डवीक कॉलनी, खंडोबामाळ, गव्हाणे वस्ती, भोसरी गावठाण, लांडेवाडी आणि शांतीनगर परिसराचा समावेश असून, या सर्व भागांचा समतोल विकास साधण्याचा निर्धार भाजपकडून व्यक्त करण्यात आला.

### विकासाभिमुख हिंदुत्वाचा विचार – भाजपाचा ठाम निर्धार

हिंदुत्वाच्या सांस्कृतिक मूल्यांवर आधारित विकासाचा मार्ग स्वीकारत भारतीय जनता पार्टीने पिंपरी-चिंचवड शहराच्या सर्वांगीण प्रगतीचा संकल्प केला आहे. मूलभूत सुविधा, पायाभूत विकास, सुरक्षितता, स्वच्छता आणि सुशासन या माध्यमातून नागरिकांच्या जीवनमानात सकारात्मक बदल घडवण्याचा भाजपाचा ठाम निर्धार आहे. परंपरा जपत आधुनिकतेकडे वाटचाल करणारा हा विकासाभिमुख हिंदुत्वाचा विचार पुन्हा एकदा जनतेसमोर मांडत भाजपाने विश्वासार्ह नेतृत्व आणि स्थिर प्रशासन देण्याची भूमिका स्पष्ट केली आहे.
“प्रभाग क्रमांक ७ चा सर्वांगीण आणि शाश्वत विकास हेच माझे प्रमुख ध्येय आहे. प्रत्येक नागरिकाच्या मूलभूत गरजा पूर्ण करताना पारदर्शक, गतिमान

## स्नेहा कलाटे यांच्या नागरी संवाद दौऱ्याला उत्स्फूर्त प्रतिसाद

## प्रभाग क्र.26 मधून स्नेहाताई कलाटेंना नागरिकांचा वाढता पाठिंबा

। पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी | स्नेहा कलाटे यांच्या नागरी संवाद दौरा-जनआशीर्वाद दौऱ्याअंतर्गत त्यांनी प्रभाग क्रमांक २६ मधील वेणू नगर परिसरात नागरिकांच्या भेटी घेतल्या. या दौऱ्यादरम्यान नागरिकांनी मोठ्या उत्साहात व आपुलकीने त्यांचे स्वागत केले असून दिवसेंदिवस त्यांना नागरिकांचा पाठिंबा वाढत आहे.**

या भेटींमागील उद्देश म्हणजे प्रभागातील नागरिकांशी थेट संवाद साधून त्यांच्या मनातील प्रभागाच्या विकासाची संकल्पना जाणून घेणे हा होता. रस्ते, पाणीपुरवठा, स्वच्छता, सुरक्षा, शिक्षण, आरोग्य आदी विषयांवर नागरिकांनी आपल्या अपेक्षा व सूचना मांडल्या. प्रभागाच्या विकासासाठी नागरिकांचे योगदान तितकेच महत्त्वाचे असून, त्यांना विश्वासात घेऊन विकास साधल्यास तो सर्वांगीण व शाश्वत होईल, असे मत यावेळी व्यक्त करण्यात आले.

दरम्यान, प्रभाग क्र.२६ मधून स्नेहा कलाटे यांची उमेदवारी भाजपाकडून निश्चित मानली जात असून, त्यांच्या आजवरच्या सामाजिक कार्यामुळे त्या प्रबळ दावेदार ठरत आहेत. त्यांच्या कार्यपद्धतीवर विश्वास व्यक्त करत नागरिकांनी त्या विजयी होतील, असा विश्वासही या प्रसंगी व्यक्त केला.



## इंद्रायणीनगर-भोसरी प्रभागात

# भाजपाचा उच्चशिक्षित पॅनेल!

### मिशन-PCMC: डॉ. सुहास कांबळे यांच्या उमेदवारीमुळे प्रभागात उत्साह

**। पिंपरी चिंचवड ।**
**प्रतिनिधी : महाईन्यूज**

**पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या २०२६ च्या निवडणुकीत इंद्रायणीनगर-भोसरी प्रभाग क्रमांक ८ मध्ये भाजप-शिवसेना-आरपीआय महायुतीच्या उच्चशिक्षित पॅनेलने चर्चा निर्माण केली आहे. या पॅनेलच्या सदस्यांमध्ये शैक्षणिक आणि व्यावसायिक क्षेत्रात यशस्वी व्यक्तिमत्त्वांचा समावेश आहे, ज्यामुळे प्रभागातील नागरिकांमध्ये उत्साहाचं वातावरण निर्माण झालं आहे.**



भाजपाच्या या उच्चशिक्षित पॅनेलच्या प्रमुख उमेदवारांमध्ये डॉ. सुहास लक्ष्मण कांबळे यांचा समावेश आहे, ज्यांचा वैद्यकीय क्षेत्रातील तज्ज्ञ अनुभव आणि समाजसेवेतील योगदान प्रभागातील नागरिकांसाठी एक महत्त्वाचा आधार बनू शकतो. डॉ. कांबळे यांची उमेदवारी प्रभागाच्या विकासासाठी एक मोठा टर्निंग पॉइंट ठरू शकते, असा विश्वास स्थानिक नागरिक व्यक्त करत आहेत.

मिशन-PCMC अंतर्गत डॉ. कांबळे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी केलेल्या प्रचाराने इंद्रायणीनगर-भोसरी प्रभागात मोठ्या प्रमाणावर उत्साह निर्माण केला आहे. उमेदवार डॉ. कांबळे यांनी आपल्या प्रचारात नागरिकांच्या आरोग्य, स्वच्छता आणि सुरक्षा संबंधित मुद्द्यांवर विशेष भर दिला आहे. त्यांच्या तज्ज्ञ ज्ञानामुळे आणि प्रगतीशील दृष्टिकोनामुळे स्थानिक नागरिकांना विश्वास आहे की, आगामी पिढीसाठी प्रभागात पायाभूत सुविधांमध्ये सुधारणा होईल.

प्रभाग क्रमांक ८ मधील इंद्रायणीनगर, भोसरी, आणि आसपासच्या क्षेत्रांमध्ये जे विकासाचे मोठे कार्य महेशदादा लांडगे यांच्या नेतृत्वाखाली सुरू झाले, त्याची पुढची पायरी याच उच्चशिक्षित पॅनेलच्या माध्यमातून उचलण्याची योजना आहे. शहरीकरण, पाणीपुरवठा, रस्त्यांचे मॅनेजमेंट, तसेच महिला आणि युवकांसाठी विविध सक्षमीकरण कार्यक्रमांच्या बाबतीत डॉ. कांबळे यांचे ठोस दृष्टिकोन कार्यान्वित केले जात आहेत.

### नागरिकांची अपेक्षा...

"उच्चशिक्षित पॅनेल म्हणजे नवा दृष्टिकोन आणि यशस्वी परिणाम" अशी अनेक नागरिकांची भावना आहे. ते मानतात की, शैक्षणिक पार्श्वभूमी आणि क्षेत्रीय अनुभव असलेल्या उमेदवारांद्वारे प्रभागातील समस्यांवर अधिक ठोस आणि तांत्रिक उपाय सादर केले जाऊ शकतात. डॉ. कांबळे यांच्या उमेदवारीमुळे येथील नागरिकांना विश्वास वाटतो की, त्यांचा अनुभव आणि कार्यशक्ती प्रभागाच्या सर्वांगीण विकासासाठी महत्त्वाची ठरेल. डॉ. कांबळे आणि त्यांच्या सहकाऱ्यांची टीम डोर-टू-डोर प्रचार करण्यात सक्रिय असून, त्यांनी घराघरात जाऊन स्थानिक नागरिकांच्या समस्या समजून घेतल्या आहेत. त्याचबरोबर, इंद्रायणीनगर-भोसरी प्रभागातील प्रत्येक क्षेत्रात होणाऱ्या विकासकामांचा उल्लेख करत, भविष्यकाळातील योजनांची मांडणी केली आहे. नागरिकांच्या मागण्या, सूचना आणि अपेक्षांनुसार त्यांचे कार्य ठरवण्याची तयारी आहे. "विकासाची दिशा, भाजपाच्या उच्चशिक्षित पॅनेलकडून!" अशी घोषणा करत, भाजपाच्या उमेदवारांनी प्रभागातील नागरिकांमध्ये विश्वास निर्माण केला आहे.

"आपल्या प्रभागातील प्रत्येक नागरिकाच्या आरोग्य, सुरक्षा आणि विकासाशी संबंधित आव्हानांना सामोरे जाण्याची तयारी आहे. उच्चशिक्षण आणि तज्ञतेच्या आधारावर, मी सर्वांगीण विकासासाठी ठोस आणि प्रभावी उपाय राबविण्याचा संकल्प घेत आहे. इंद्रायणीनगर-भोसरी प्रभागातील प्रत्येक घरातील समस्या समजून, आम्ही प्रत्येक नागरिकाच्या अपेक्षांची पूर्णता करू. 'विकासाची वाट', हेच माझं ध्येय आहे आणि त्यासाठी मी नेहमी तुमच्यासोबत आहे."

**— डॉ. सुहास कांबळे,**
प्रसिद्ध अस्थिरोग तज्ञ, उमेदवार, भाजपा, इंद्रायणीनगर-भोसरी.

## इंद्रायणीनगर- भोसरी प्रभाग-8 मध्ये राष्ट्रवादीचा उमेदवार कोण?

### मिशन- PCMC: माजी आमदार विलास लांडे यांच्या भूमिकेकडे लक्ष

**। पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज**

**पिंपरी-चिंचवड शहरातील राष्ट्रवादी काँग्रेसचे मातब्बर नेते माजी आमदार विलास लांडे यांचे 'होमपिच' असलेल्या इंद्रायणीनगर- भोसरी प्रभाग- 8 मधून राष्ट्रवादी काँग्रेसचा उमेदवार कोण असेल? अशी राजकीय चर्चा जोर धरु लागली आहे.**



पिंपरी-चिंचवड महापालिका निवडणूक रणसंग्रामाचा शंखनाद सुरू झाला असून, उमेदवारी निश्चितीची जोरदार रस्सीखेच सुरू आहे. महानगरपालिका प्रभाग क्रमांक 8 मधून माजी आमदार विलास लांडे यांच्या सौभाग्यवती आणि माजी महापौर मोहीनी लांडे आणि मुलगा विक्रांत लांडे यांनी निवडणूक लढवली आहे. 2017 च्या निवडणुकीत विक्रांत लांडे या प्रभागातून निवडून आले होते.

दरम्यान, 2017 ते 2024 या काळात शहरासह राज्यातील राजकारणात मोठे फेरबदल झाले. विधानसभा निवडणुकीत लांडे परिवार शरद पवार गटात दाखल झाला होता. त्यानंतर पुन्हा अजित पवार यांच्यासोबत त्यांनी जुळवून घेतले आहे. आता महापालिका निवडणुकीत विक्रांत लांडे मैदानात उतरण्याच्या तयारीत आहेत. महापालिका प्रभाग क्र. 8 मध्ये जय गणेश साम्राज्य, जलवायु विहार, केद्रींय विहार, पीएमआरडीए सेक्टर १२ गृहप्रकल्प, संत नगर, महाराष्ट्र कॉलनी, इंद्रायणीनगर, खंडेवस्ती, गवळीमाथा, बालाजीनगर परिसराचा समावेश आहे. या प्रभागात अ) अनुसुचित जाती, ब) महिला ओबीसी, क) महिला सर्वसाधारण आणि ड) सर्वसाधारण असे आरक्षण आहे. त्यामुळे सर्वसाधारण गटातून विक्रांत लांडे यांना उमेदवारी घ्यावी लागेल.

**पराभूत मानसिकता नको, आत्मविश्वास हवा?**

महापालिका निवडणुकीच्या निमित्ताने भाजपाने राष्ट्रवादीवादीवर अक्षरश: सर्जिकल स्ट्राईक केला. अनेक दिग्गज नेते भाजपात दाखल झाले. त्यामुळे राष्ट्रवादीच्या स्थानिक नेत्यांची मानसिकता पराभूतपणाची झाली आहे. काही झाल्यास राष्ट्रवादीला "कम बॅक" करता येणार नाही, असा काहींचा सूर आहे. मात्र, "मन के जिते जित...मन के हारे हार.." या उत्कीप्रमाणे राष्ट्रवादीच्या नेत्यांनी भाजपासोबत आत्मविश्वासपूर्ण लढाई करावी. भाजपामध्ये इच्छुकांची संख्या जास्त असून, बंडखोरी होवू शकते आणि तसे नाही झाल्यास नाराज इच्छुक तटस्थ भूमिका घेवू शकतात. त्याचा फायदा राष्ट्रवादीला होईल.

### विक्रांत लांडे की मोहिनी लांडे..?

दरम्यान, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या उपस्थितीमध्ये माजी आमदार विलास लांडे यांनी शिवसेना उबाठा पक्षातील तुषार सहाणे यांचा राष्ट्रवादीत प्रवेश करुन घेतला आहे. 2017 च्या निवडणुकीत तुषार सहाणे यांनी विक्रांत लांडे आणि सारंग कामतेकर यांच्या विरोधात निवडणूक लढवली होती. त्याचा फायदा विक्रांत लांडे यांना झाला होता. मात्र, सहाणे यांच्या प्रवेशामुळे सर्वसाधारण गटातील जागेवर त्यांनी दावा केल्याचे समजते. तसे झाल्यास लांडे कुटुंबियांना सर्वसाधारण महिला गटातील उमेदवार रिंगणात आणावा लागेल आणि राजकीय 'फ्युचर' असलेल्या विक्रांत लांडे यांना 2031 ची प्रतीक्षा करावी लागणार आहे. किंवा सौभाग्यवतींना उमेदवारी घ्यावी लागेल. दुसरीकडे, राजकारणातून निवृत्तीच्या वाटेवर असलेल्या माजी महापौर मोहीनी लांडे यांना पुन्हा लांडे घरण्यासाठी निवडणुकीच्या मैदानात उतरणार का? अशी चर्चा सुरू झाली आहे.

## इंद्रायणीनगरमध्ये विकासाचा आश्वासक चेहरा

# तरुण नेतृत्व तुषार सहाणे ठरतायेत जनसामान्यांची पसंती!

### म्हणून तुषार सहाणे यांना नागरिकांची "प्रायोरिटी"

| पिंपरी चिंचवड |
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी चिंचवड निवडणुकीचे रणशिंग फुंकले गेले असून प्रभाग क्रमांक ८, इंद्रायणी नगरमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार तुषार सहाणे यांनी प्रचारात मोठी आघाडी घेतली आहे. एका सामान्य कुटुंबातून येऊन उद्योग क्षेत्रात स्वतःचे स्थान निर्माण करणाऱ्या या यशात आपल्या अनेक सहकाऱ्यांना सोबत घेऊन चालणाऱ्या या तरुण नेतृत्वाला मतदारांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.**





प्रचाराच्या सुरुवातीपासूनच तुषार सहाणे यांनी 'थेट संवाद' हा आपला मुख्य आधार बनवला आहे. घराघरांत जाऊन, नागरिकांशी प्रत्यक्ष चर्चा करत ते त्यांच्या दैनंदिन अडचणी समजून घेत आहेत. विशेषतः महिलांशी संवाद साधताना पाणीपुरवठा, सुरक्षितता, आरोग्य सुविधा, स्वच्छता आणि रस्त्यांची दुरवस्था यासारख्या प्रश्नांवर महिलांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. यावेळी बोलताना सहाणे म्हणाले, "मी केवळ निवडणूक जिंकण्यासाठी नव्हे, तर तुमच्या समस्या कायमस्वरूपी सोडवण्यासाठी मैदानात उतरलो आहे." त्यांच्या या ठाम भूमिकेला महिलांकडून विशेष प्रतिसाद मिळाला.

प्रचाराच्या पहिल्याच टप्प्यात तुषार सहाणे यांनी युवक, ज्येष्ठ नागरिक, व्यापारी वर्ग आणि महिला अशा सर्व स्तरांतील नागरिकांशी संपर्क प्रस्थापित केला आहे. "सामान्य घरातील मुलगा जेव्हा निवडणुकीत उतरतो, तेव्हा त्याला जनतेच्या वेदना अधिक चांगल्या प्रकारे कळतात," अशी भावना अनेक नागरिक व्यक्त करत आहेत. त्यामुळेच इंद्रायणी नगरमध्ये सहाणे हे 'लोकांचा हवा-हवासा नेता' म्हणून ओळखले जाऊ लागले आहेत.

स्थानिक प्रश्नांवर स्पष्ट आणि ठाम भूमिका, तसेच भविष्यासाठी मांडलेली विकासाची दृष्टी यामुळे नागरिकांचा पाठिंबा दिवसेंदिवस वाढताना दिसत आहे. पालिकेच्या माध्यमातून प्रभागाचा सर्वांगीण विकास, युवकांसाठी रोजगार व कौशल्यविकास योजना, तसेच महिला सक्षमीकरणासाठी ठोस उपक्रम राबविण्याचा त्यांचा मानस आहे. महिलांना हक्काचे व्यासपीठ मिळवून देण्याचे आश्वासनही त्यांनी दिले आहे. माजी प्रमुख विश्वस्त, जेजुरी देवस्थान या नात्याने सामाजिक व धार्मिक क्षेत्रातील अनुभवाची शिदोरीही त्यांच्या पाठीशी आहे. त्यामुळे विकास, विश्वास आणि कार्यक्षम नेतृत्व यांचे प्रतीक म्हणून तुषार सहाणे यांच्याकडे पाहिले जात आहे. येत्या निवडणुकीत इंद्रायणी नगरमधील जनतेची पसंती कोणाला मिळते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

#### लोकांचा 'हवा-हवासा' वाटणारा नेता

"सामान्य घरातील मुलगा जेव्हा निवडणुकीत उतरतो, तेव्हा त्याला जनतेच्या वेदनांची अधिक चांगली जाण असते," अशी भावना प्रभागातील नागरिक व्यक्त करत आहेत. राष्ट्रवादी काँग्रेसच्या माध्यमातून आपले आणि प्रभागाचे भवितव्य घडवण्यासाठी तुषार सहाणे करत असलेली धडपड सध्या चर्चेचा विषय ठरली आहे.

" स्थानिक प्रश्नांवरील ठाम भूमिका आणि भविष्यातील स्पष्ट राजकीय संकल्पना यामुळे इंद्रायणी नगरमध्ये नागरिकांचा प्रचंड पाठिंबा मिळत आहे. पालिकेच्या माध्यमातून प्रभागाचा विकास सोबतच युवकांसाठी अनेक कल्याणकारी योजना राबविण्याचा मानस आहे. महिला सक्षमीकरण करत महिलांना हक्काचे व्यासपीठ मिळवून देणार आहे.

**—तुषार सहाणे,** माजी प्रमुख विश्वस्त जेजुरी देवस्थान

---

## मोशीत परिवर्तनाचा नारा : "प्रश्न अनेक... उत्तर एकच – प्रा. कविता आल्हाट"

### घराघरांतून मिळतोय विश्वासाचा प्रतिसाद; विकासाच्या मुद्द्यांवर प्रचारात आघाडी

| पिंपरी | प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी-चिंचवड महानगरपालिका निवडणुकीत प्रभाग क्रमांक २ मधून राष्ट्रवादी काँग्रेसच्या उमेदवार प्रा. कविता आल्हाट यांनी प्रचारात स्पष्ट आघाडी घेतली असून, त्यांच्या प्रचारामुळे परिसरात सकारात्मक आणि परिवर्तनाचे वातावरण निर्माण झाले आहे. "प्रश्न अनेक... उत्तर एकच – प्रा. कविता आल्हाट" या ठोस आणि प्रभावी घोषवाक्यासह त्यांनी प्रचाराला वेग दिला आहे.**



प्रभागातील पाणीपुरवठा, रस्त्यांची अवस्था, स्वच्छता, महिला सक्षमीकरण, युवकांचे प्रश्न तसेच मूलभूत नागरी सुविधांबाबत नागरिकांमध्ये असलेल्या असंख्य प्रश्नांवर विश्वासार्ह आणि सक्षम उत्तर देणारे नेतृत्व म्हणून मतदार प्रा. कविता आल्हाट यांच्याकडे पाहत आहेत. त्यामुळे त्यांच्या प्रचाराला सर्व स्तरांतून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळताना दिसत आहे.

घराघरात जाऊन थेट संवाद साधत त्या नागरिकांच्या समस्या समजून घेत आहेत. केवळ आश्वासनांपुरते न थांबता, समस्या सोडवण्यासाठी ठोस नियोजन मांडत असल्याने मतदारांमध्ये त्यांच्याबद्दल विश्वास वाढत आहे. शिक्षण क्षेत्रातील अनुभव, सामाजिक कार्याची भक्कम पार्श्वभूमी आणि अभ्यासू नेतृत्व या बळावर त्यांनी प्रचारात वेगळी ओळख निर्माण केली आहे.

प्रभागातील महिला, ज्येष्ठ नागरिक आणि युवक वर्गामध्ये त्यांच्या प्रचाराची विशेष चर्चा असून, "प्रश्न ऐकून घेणारी, उपाय सांगणारी आणि काम करून दाखवणारी नेत्या" अशी प्रतिमा प्रा. कविता आल्हाट यांनी अल्पावधीतच निर्माण केली आहे.

आगामी महानगरपालिका निवडणुकीत प्रभाग क्रमांक २ मधून राष्ट्रवादी काँग्रेसला भक्कम यश मिळवून देण्यात प्रा. कविता आल्हाट यांचा प्रचार निर्णायक ठरण्याची शक्यता राजकीय जाणकार व्यक्त करत आहेत.

" माझ्या प्रभागातील प्रत्येक नागरिकाची समस्या ही माझ्यासाठी वैयक्तिक जबाबदारी आहे. पाणी, रस्ते, स्वच्छता, आरोग्य, महिला व युवकांचे प्रश्न याकडे केवळ तक्रार म्हणून नाही, तर तातडीने सोडवायची जबाबदारी म्हणून मी पाहते. निवडून आल्यावर केवळ आश्वासनं न देता, आधुनिक नियोजन, पारदर्शक कामकाज आणि सातत्यपूर्ण पाठपुराव्याच्या माध्यमातून प्रत्येक घरापर्यंत मूलभूत सुविधा पोहोचवण्याचा माझा ठाम संकल्प आहे.

**—प्रा. कविता आल्हाट,** उमेदवार, राष्ट्रवादी काँग्रेस, प्रभाग क्रमांक- २.


Express
Media Enterprises
Professional Live set up with live drone available..
• Documentary
• Weddings
• Drone
• Motion Graphics
• Testimonials
• Tutorial videos
• Product Videos
• Animation
• Social Media Content
• Promotional Videos
• Real Estate
• Corporate
• Advertising
• Events
PUNE
Contact: 9657767000/9370493922/9664188046